# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०५/०३/२०२३

## ➢ खुन :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | नागपुरी गेट अप कं. ११०/२०२३ कलम ३०२,३४ भादंवी | आरोपीचे राहते घरी बिसमिल्ला नगर अमरावती | दिनांक ०१/०३/२०२३ चे २२.०० वा ते ०२/०३/२०२३ चे ०८.०० वा दरम्याण<br><br>दिनांक ०४/०३/२०२३ चे २३.२३ वा | मोहिन खान रमजान खान वय-२४ वर्ष रा.इरफान नगर लालखडी अमरावती<br><br>मृतकाचे नांव- रमजान खान वय ५४ वर्ष रा.इरफान नगर लालखडी अमरावती | १)नसीरोद्दीन नईमोद्दीन वय-५५ वर्षे, रा बिसमिल्ला नगर अमरावती<br>२) एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की,पो.स्टे नागपुरी गेट अमरावती येथे दि.२/०३/२०२३ रोजी मर्ग क्र.०४/२३ कलम १७४ जाफौ प्रमाणे दाखल असुन सदर मर्ग चौकशी दरम्याण फिर्यादी मृतकाचा मुलगा यांनी फिर्याद दिली की, यातील मृतक हा भंगार खरेदी विक्री चे काम करीत असल्याने आरोपी क्र.१ याला सोबत मजुरी करिता नेत असल्याने त्याचे घरी जाणे येणे होते. त्यामुळे आरोपी क्र २ हिचे सोबत त्याचे अनैतिक संबध असल्याने नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील मृतक हा आरोपी याचे घरी गेल्याने त्यांच्यात वाद होवुन दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन मृतकास कोणत्यातरी हत्याराने कपाळावर, उजव्या कानाच्या बाजुला वार करुन जिवानिशी ठार करुन बाजुच्या पडक्या घरात ठेवले आरोपीच्या घरी फिर्यादीला डाग असल्याचे दिसुन आले, दिलेल्या रिपोर्ट व मर्ग चोकशी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | भातकुली 50/2023 कलम 323,324,भादवि | इंदीरानगर भातकुली | 03/03/2023 चे 22.30 वा<br>03/03/2023 चे 24.00<br>दाखल - 04/03/2023 चे 00.04 वा | श्रावण किसनराव किरडे वय 65 वर्षे धंदा मजुरी रा इंदीरानगर भातकुली | राजु शामराव पवार वय 45 वर्षे रा इंदीरानगर भातकुली | हकीकत- अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे जेवण करुन घराबाहेर झोपण्या करीता आले असता बाहेर कुत्रे भुकत असल्याने गल्लीत आले असता भुंकणार्या कुतऱ्या मागे आरोपी नामे राजु शामराव पवार हा काठी घेवुन होता फिर्यादीने काय झाले असे म्हटले असता त्याने त्याच्या हातातील काठी फिर्यादीच्या दोन्ही हाताच्या ढोपरावर मारली त्यामुळे फिर्यादीचे यांचा मुलगा उमेश किरडे हा भांडण सोजण्या करीता आला असता त्याला सुद्दा मारहाण केली .त्यानंतर तो काठी मारुन तेथुन निघुन गेला तो दारु पिल्या सार्खा वाटत होता अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदर चा गुन्हा दाखल |

## ➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र २२९/२०२३<br>कलम ३५४(ड) ,५००,५०१ भादवी | दि.०३/०३/२३ चे पुर्वि पासुन<br><br>दि.-०४/०३/२३ चे २०/५२ वा | विश्वजीत दत्तात्रय देशपांडे वय २९ वर्ष रा कंपनी आँफ शेअर यांचे बाजुला नवी मुंबई | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यातील फिर्यादी हीचे ओळख सोशल मिडीयावर मैत्री झाली मैत्रिचे रुपांतर प्रेमात झाले त्यांचे ०४ ते ०५ वर्षापासुन प्रेम संबंध होते नमुद आरोपी हा विनाकारण त्रास देत असल्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचे सोबत ब्रेकअप केले होते तेव्हा सात महीण्यापासुन नमुद आरोपी यांचे मो नं वरुन फोन करुन फिर्यादीचे मो वर वारंवार फोन करुन त्रास देत होता. फिर्यादीच्या नातेवाईकांना त्यांनी सोबत काढलेले जवळीक फोटो सोशल मिडीयावर ठेवुन फिर्यादीची बदनामी करीत आहे नमुद फि च्या भावाचे फेसबुक अकाउंट वर त्याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविलेली असुन फेसबुकच्या प्रोफाईलवर फोटो ठेवलेले आहे अशा प्रकारे नमुद आरोपी हा वारंवार सोशलमिडीयावर फि चे आरोपी सोबतचे फोटो वायरल करुन बदनामी करतो त्यामुळे त्यांना शारीरीक व मावसिक त्रास होत आहे अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ चोरी :- ०१

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | भातकुली अप नं 51/2023 कलम 379 भादवी प्रमाणे | ग्राम हरतोटी किसन गवंजे यांचे घराजवळ असलेल्या खुल्या जागेमधील 10 कि.मी उत्तर | दि 01.03.23 चे 17.00 वा ते दि 04.03.23 चे 11.00 वा दरम्याण<br>दि 04.03.23 चे 19.30 वा<br>दि 04.03.23 चे 20.04 वा | निलेश नंदकिशोर डगवाळे वय34 वर्ष रा. हरतोटी ता भातकुली जि अमरावती | अज्ञात इसम | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी जबानी रिपोर्ट दिला की, त्याचे कडे दोन ट्रॅक्टर असुन शेतीचे साहित्य आहे ते त्यांचे शेतीचे साहित्य किसन गवंजे यांचे घरासमोर असलेल्या खुल्या जागेमध्ये ठेवतात फिर्यादी हे दि 28.02.23 रोजी महाराष्ट्र दर्शनाकरीता गेले असता तेव्हा त्यांचे साहित्य किसन गवंजे यांचे घराजवळ ठेवले होते तर सकाळी 11.00 वा.चे दरम्याण घरी परत आले तर घराजवळ ठेवलेला तीन फाडी पिवळ्या रंगाचा नांगर कि अं30,000/-रु चा दिसुन आला नाही दि 01.03.23 चे 17.00 वा ते दि 04.03.23 चे 11.00 वा दरम्याण कोणीतरी अज्ञात ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर लावुन लोखंडी नांगर चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ ईतर:-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | बडनेरा. अप.नं. १८३/२३ कलम २९४, ३२३, ४५२ भा. दं. वि. | अमरावती. | घ. ता.वेळ - दि. ०४.०३.२३ चे १७.३० वा. माहीती वेळ - दि. ०४.०३.२३ चे १९.३० वा. दाखल ता. वेळ -दि. ०४.०३.२३ चे २०.४१ वा. | एक महिला | देवराव नामदेवराव तायडे, वय ५० वर्षे, रा. गौरखेडा, ता. भातकुली, जि. अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी या ग्राम गौरखेडा येथे उपसरपंच असुन आरोपी हा फिर्यादीच्या घरासमोर राहतो व त्याला दारू पिण्याचे व्यसन आहे. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ही घरात असतांना आरोपी हा घरासमोर दारू पिऊन आला व माझ्या मुलाचे घरकुल भेटले नाही, असे म्हणुन अश्लिल शिवीगाळकरून घरात प्रवेश करून फिर्यादीसोबत लोंबाझोंबी करून तिचे केस ओढले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ३. | पो स्टे खोलापुरी गेट मर्ग क्रं. ०९/२०२३ कलम १७४ जाफौ. | जवाहरगेट गल्ली क्रं.1अमरावती ०४/०३/२०२३ चे १६/३० वाजता दाखल ता वेळ ०४/०३/२०२३ चे २२/१६ वाजता | सुरेश कुटे वय ६५ वर्ष रा. शेगांव नाका अमरावती | सरतर्फ पोउपनि नानाजी चौधरी पो स्टे खोलापुरी गेट | ब्रॉंड डेत्थ | हकीकत अशा प्रकारे आहे की,आज दि.०४/०३/२०२३ रोजी आमची २१/०० वा ते दि.०५/०३/२०२३ चे ०८/०० वा पावेतो स्टे.डा.ड्युटी असतांना डीओ पोउपनि चौधरी सा यांनी ईर्विन दवाखाना अमरावती येथुन मेमो क्रं. ०६३१ पो स्टे ला आणुन पो स्टे ला दाखल केला. मेमो मध्ये मृतक नामे सुरेश कुटे हा वार्ड क्रं. १३ येथे भर्ति असता पुढील उपचारा कामी वैधकीय रुग्णालय नागपुर येथे रेफर केले त्यास रुग्णवाहीका १०८ ने नागपुर येथे नेत असतांना नांदगाव पेठ चे समोर त्यास मृत्यु आल्याने ईर्विन दवाखाना येथे परत आणले व त्यास डॉ.सा यांनी ब्रॉंड देत्थ घोषीत केले अशा ईर्विन दवाखाना अमरावती यांचे मेमो वरुन सदरचा मर्ग दाखल करुन पुढील तपास कामी पोउपनी नानाजी चौधरी यांचे कडे देण्यात आली.अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **प्रोव्हीशन रेड :- ०५**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पोस्टे गाडगेनगर अमरावती | अपक्र ३१३/२०२३ कलम ६५ इ म दा का | अमरावती | दि ४.३.२०२३ चे ११.१५ वा | दि ४.३.२०२३ चे १७.११ वा | सर तर्फे नापोकॅा एजाज शहा मदार शहा बनं २०४ रा अमरावती | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी नमुद महीला ही तीचे राहते घरासमोर अवैध्यरीत्या देशीदारू ची वीक्री करतांना मीळुन आली दारू विक्री करण्याबाबत परवाना विचारला असता नसल्याचे सांगीतले सदर महीला कडे ४८ नग देशी दारू की अं ३८४० रू चा माल विक्क्री करीत जवळ बाळगुन मीळुन आली वरून सदर महीले विरूध्द सदर चा गुन्हा दाखल |